# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 03/06/2023 (शनिवार) दुपार


### अवैध रेती चोरी करणाऱ्या आरोपींविरूद्ध गुन्हा नोंद
### पोलीस स्टेशन खापरखेडाची कारवाई

**पोस्टे खापरखेडा :–** अंतर्गत ०४ कि. मी. अंतरावरील मौजा बिनासंगम वार्ड क्र. १ खापरखेडा येथे दिनांक ०२/०६/२०२३ चे ९/१० वा. ते दिनांक ०२/०६/२०२३ चे ९/५० वा. दरम्यान पोलीस स्टेशन खापरखेडा येथील स्टाफ यांना मुखबिरव्दारे खबर मिळाली की, पोलिस ठाणे खापरखेडा हद्दीतील मौजा बिनासंगम वार्ड क्र. १ खापरखेडा येथे अवैधरीत्या विनापरवाना रेतीची चोरटी वाहतुक होत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहितीवरून मौजा बिनासंगम वार्ड क्र. १ खापरखेडा येथे पोलीस स्टेशन खापरखेडा येथील पोलिस स्टाफ यांनी नमुद घटनास्थळी जावून चेक केले असता **आरोपी नामे– मोहम्मद हरीश सरवर खान, वय ४३ वर्ष, रा. बिना संगम वार्ड क्र. १ खापरखेडा** याने आपले ताब्यातील टाटा कंपनीची ०६ चक्का टाटा क्र. एम. एच.– ४० एन.– ०४४६ मध्ये विनापरवाना (रॉयल्टी) रेतीची चोरटी वाहतुक करतांना मिळुन आल्याने त्याचे ताब्यातुन १) २ ब्रॉस रेती प्रत्येकी किंमती ४,०००/– रु. प्रमाणे एकुण अंदाजे किंमती ८,०००/– रु २) टाटा कंपनीची ०६ चक्का टाटा क्र. एम एच.– ४० एन ०४४६ अंदाजे किंमती ५,००,०००/– रु. असा एकुण ५,०८,०००/– रुपयाचा मुददेमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी सरकार तर्फे पोलीस उपनिरीक्षक शरद डोंगरे पोस्टे खापरखेडा यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोउपनी शरद डोंगरे पोस्टे खापरखेडा मो. नं ९५५२११७७७० हे करीत आहे.

### घरफोडी

**पो.स्टे. काटोल**:– अंतर्गत ०२ कि. मी. अंतरावरील सावरगाव रोड खंते ले आउट काटोल येथे दिनांक ०१/०६/२०२३ चे २२.३० वा. दिनांक ०२/०६/२०२३ चे ०६.३० वा. सुमारास फिर्यादी नामे– श्रीमती रेखा रामराव कोठे, वय ६२ वर्ष, रा. सावरगाव रोड खंते ले आउट काटोल तह. काटोल जि. नागपुर हिचे पती मरण पावले असुन एक मुलगा आहे. तो नागपुर येथे राहतो. यातील फिर्यादी हि दि. ०१/०६/२०२३ चे रात्री २२/३० वा. सुमारास घराशेजारी राहणाऱ्याकडे झोपण्यास गेली असता दि. ०२/०६/२०२३ चे सकाळी ०६/३० वा. परत आपले घरी आली असता तिला तिचे घराचे दाराचे कुलुप तोडुन दार उघडलेले दिसले. फिर्यादीने घराचे आत जाउन बघितले असता सामान अस्ताव्यस्त पडलेले दिसले तसेच फिर्यादीने तिचे कपाटामध्ये ठेवलेले ३० वर्षापुर्वी घेतलेले एक सोन्याची अंगुठी ३ ग्रॅम किंमती ८०००/– रू. २) पेटीत ठेवलेला १२ ग्रॅम जुना वापरता सोन्याचा गोफ किंमती ३०,०००/–रू. ३) चांदीच्या पायपट्टया दोनजोड ३ तोळयाच्या किंमती ३०००/– रू असा एकुण ४१,०००/– रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा/१६२५ प्रभुदास दलाल पो.स्टे काटोल मो. नं. ९५६१५६४८५२ हे करीत आहे.


पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर